# प्रेस नोट

गोंदिया जिल्हयातील आदिवासी व दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकिय अधिकारी (गट-ब) या रिक्त असलेल्या पदांवर ११ महिन्यांचे कालावधीकरीता बीएएमएस अर्हताधारक उमेदवारांची समुपदेशनाद्वारे कंत्राटी/तदर्थ स्वरुपात नियुक्ती करावयाची आहे. तरी B.A.M.S.अर्हताधारक उमेदवारांनी आवश्यक दस्तऐवजांसह दिनांक ०५/०७/२०२४ (शुक्रवार) रोजी स्व.वसंतराव नाईक सभागृह, प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद गोंदिया येथे सकाळी १०.०० वाजता थेट मुलाखतीकरीता (Walk in Interview) उपस्थित राहावे. सविस्तर जाहिरात gondia.gov.in तसेच zpgondia.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

स्वा/-

सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,गोंदिया

# वैद्यकिय अधिकारी (गट-ब) या पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्तीकरीता

## Walk in Interview (समुपदेशन)

मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनी मंजुर केलेल्या टिपणीनुसार **BAMS** अर्हताधारक उमेदवारांची वैद्यकिय अधिकारी (गट-ब) या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता समुपदेशनाव्दारे **दिनांक ०५/०७/२०२४ (शुक्रवार)** रोजी **सकाळी ११.०० ते १२.३०** वाजेपर्यंत स्व.वसंतराव नाईक सभागृह, प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, गोंदिया येथे मुलाखत (Walk in Interview) घेण्यात येणार आहे. तरी BAMS अर्हताधारक उमेदवारांनी वरील दिनांकास सकाळी १०.०० वाजता नोंदणीकरीता वरील स्थळी उपस्थित रहावे.

गोंदिया जिल्हयातील आदिवासी व दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय अधिकारी (गट-ब) या रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे. सदर रिक्त पदांमध्ये पदांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे. (सकाळी ११.०० नंतर कोणत्याही उमेदवाराचे नावाची नोंदणी करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.)

| अ.क्र. | प्राथमिक आरोग्य केंद्र | रिक्त पदे |
|---|---|---|
| १ | मुल्ला ता.देवरी | १ पद |
| २ | फुटाणा ता.देवरी | १ पद |
| ३ | ककोडी ता.देवरी | १ पद |
| ४ | घोनाडी ता.देवरी | १ पद |
| ५ | बिजेपार ता.सालेकसा | १ पद |
| ६ | खोडशिवनी ता.सालेकसा | १ पद |
| **अ.क्र.** | **संभाव्य रिक्त होणारे प्राथमिक आरोग्य केंद्र** | **रिक्त पदे** |
| १ | महागांव ता.अर्जुनीमोर (रिक्त दि.१६-०७-२०२४) | १ पद |
| २ | गोठणगांव ता.अर्जुनीमोर (रिक्त दि.०१-०७-२०२४) | १ पद |
| ३ | सातगांव ता.सालेकसा (रिक्त दि.०१-०७-२०२४) | १ पद |
| | **एकूण** | **९ पदे** |

अटी :- १) वैद्यकिय अधिकारी (गट-ब) पदाकरीता अर्ज करणाऱ्या BAMS अर्हताधारक उमेदवारांना सुचित करण्यात येते की, मुलाखतीस येतांना सर्व शैक्षणिक दस्तऐवज (सर्व उत्तीर्ण/अनुतीर्ण गुणपत्रिकेसह), वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, पासपोर्ट फोटो, इतर आवश्यक सर्व प्रमाणपत्रांची मुळ प्रत यांचा छायांकित प्रतीचा एक संच सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

२) उमेदवाराचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अनाधिकृत गैरहजर/ संपात सहभागी असलेले/ शासनसेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढुन टाकलेले वैधकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

३) कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (गट-ब) पदाकरीता दर महिना मानधन : सर्वसाधारण भागासाठी - रू.४०,०००/- आणि आदिवासी दुर्गम भागासाठी - **रु.४५,०००/-**

सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

MO GAT B BHARTI 2024387